दै. तरुण भारत दि. 31/08/2023

# बहिण-भावाच्या नात्याची वीण घट्ट...

- विधायक उपक्रमाने रक्षाबंधन साजरा
- महिला संघटानांतर्फे पोलीस, सुरक्षा रक्षकांसोबत रक्षाबंधन
- वृद्धाश्रम, अनाथाश्रम, बालकल्याण संकूलातही विविध उपक्रम
- सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव : दिवसभर उत्साहाचे वातावरण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

'भैय्या मोरे राखी के बंधन को निभाना' 'एक हजारो में मेरी बहेणा है..' म्हणत, बहिण-भावाच्या नात्याची वीण घट्ट करत बुधवारी सर्वत्र मोठ्या उत्साहात रक्षाबंधन साजरा करण्यात आला. लाडक्या भाऊरायाला राखी बांधण्यासाठी सकाळपासुनच बहिणींची लगबग सुरू होती. लाडक्या बहिणीकडून सकाळी औक्षण करून घेऊनच अनेकजण घरातुन कामासाठी बाहेर पडल्याचे चित्र पहावयास मिळत होते.

विविध सामाजिक संस्था, संघटना, महिला मंडळाच्यावतीने विधायक उपक्रम राबवुन रक्षाबंधन साजरी केली. २४ तास सेवा बजावणाऱ्या शहरातील सर्व पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी, वाहतूक पोलीस, व्हाईट आर्मीचे जवान, विविध क्षेत्रातील सुरक्षा रक्षकांना राखी बांधून महिला संघटनांनी आपुलकी व्यक्त केली. शहरातील जुना राजवाडा, लक्ष्मीपुरी, शाहूपुरी, राजारामपुरी तसेच कागल, गांधीनगर पोलीस ठाण्यात विविध महिला संघटनांच्यावतीने रक्षाबंधनाचा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. महिलांनी राबविलेल्या या उपक्रमाने पोलीस कर्मचारीही भारावून गेले होते.



कोल्हापूर : बुधवारी विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी बाल कल्याण संकूलातील मुलांना राखी बांधत रक्षाबंधन साजरा केला. (छाया : शशिकांत मोरे)

औक्षण केल्यानंतर लाडक्या बहिणीला भेटवस्तु देण्यासाठी बाजारात गर्दी होती. महाद्वार रोड, पापाची तिकटी, राजारामपुरी, शाहूपुरी आदी ठिकाणी कपडे, मोबईल, घड्याळ आदी वस्तु खरेदीसाठी लगाबग सुरू होती. परगावी असणाऱ्या भावाला राखी बांधायला जाण्यासाठी महिलांनी मध्यवर्ती बसस्थानकावर गर्दी केली होती.

**बालकल्याण संकूलात विविध महाविद्यालयातर्फे रक्षाबंधन**

विवेकानंद महाविद्यालयाचे एनएसएस, महावीर महाविद्यालय, दादासाहेब मगदुम विद्यालय, न्यु इंग्लिश मिडीयम स्कूलचे सिक्स महाराष्ट्र गर्ल्स बटालीयन, शहाजी छत्रपती महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी बाल कल्याण संकूलातील मुलांसोबत रक्षाबंधन साजरा केला. येथील मुलांना मिठाई व भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

**सोशल मीडियावरून शुभेच्छांचा वर्षाव**

बहीण-भावाचे प्रेम व्यक्त करणाऱ्या हिंदी मराठी गाण्यांचे व्हाट्सॲप स्टेट्सद्वारे लाडक्या बहीणीबद्दल आपुलकी व्यक्त केली जात होती. दिवसभ सोशल मीडियावरील फेसबुक, इन्स्ट्राग्राम, व्हाट्सॲप आदी ॲप्सुवर शुभेच्छांचा वर्षाव सुरू होता.

तरुण



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या पोहाळे तर्फ आळते येथील श्रमसंस्कार शिबिरात बोलताना कौस्तुभ गावडे. सोबत सरपंच सुरेखा मोरे, सुरेश बेनाडे आदी.

# 'एनएसएस'मधून तरुणांनी राष्ट्रसेवेत सहभागी व्हावे : कौस्तुभ गावडे

कोल्हापूर : एन.एस.एस.च्या माध्यमातून तरुणांना राष्ट्रसेवेची संधी प्राप्त होते. तरुणांच्या ताकदीचा व ज्ञानाचा उपयोग शेती, उद्योग, संरक्षण, शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन इत्यादीमध्ये करून देशाच्या विकासासाठी तरुण पिढी योगदान देऊ शकते, असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयाच्या पोहाळे तर्फ आळते येथे झालेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरार्थींनी ग्राम सर्व्हे, विहीर व स्मशानभूमी स्वच्छता केली. कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. आर. बागडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शुभांगी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एल. एस. नाकाडी यांनी आभार मानले. यावेळी सरपंच सुरेखा मोरे, सुरेश बेनाडे, प्रा. संदीप पाटील, प्रा. राजश्री पाटील, प्रा. एन. पी. मोटे, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. जी.

# एनएसएसच्या माध्यमातून तरुणांनी राष्ट्रसेवेत सहभागी व्हावे : कौस्तुभ गावडे



**कोल्हापूर** : जगाच्या तुलनेत भारतामध्ये तरुणांची संख्या जास्त आहे. एन.एस.एस. व एन.सी.सी.च्या माध्यमातून आजच्या तरुण पिढीने श्रमसंस्काराची सवय लावून देशकार्यासाठी प्रवृत्त करणे हेच विकासाचे सूत्र आहे. एन.एस.एस.च्या माध्यमातून तरुणांना राष्ट्रसेवेची संधी प्राप्त होते. या संधीचा लाभ घेऊन समाजोपयोगी कामात सहभागी व्हावे. तरुणांच्या ताकदीचा व ज्ञानाचा उपयोग शेती, उद्योग, संरक्षण, शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन इत्यादींमध्ये करून देशाचा विकास करणेसाठी तरुण पिढी मोठे योगदान देऊ शकते, असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयाच्या पोहाळे तर्फ आळते येथे संपन्न झालेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. केले. सात दिवसाच्या श्रमसंस्कार शिबिरामध्ये प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरार्थींनी पोहाळे गावामध्ये ग्रामसर्व्हे, विहिरींची व स्मशानभूमी स्वच्छता, ग्रामसफाई इत्यादी कामे पूर्ण केली.

महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की, एनएसएसच्या शिबिरातून विद्यार्थ्यांनी श्रम व स्वावलंबनातून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा व समाजाचा विकास घडवावा.

कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. आर. बागडे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. पाहुण्यांची ओळख प्रा. संदीप पाटील यांनी करून दिली. प्रा. सौ. शुभांगी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. एन. एस. नाकाडी यांनी आभार मानले.

यावेळी सरपंच सौ. सुरेखा मोरे, सुरेश बेनाडे, प्रा. राजश्री पाटील, प्रा. एन. पी. मोटे, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. जी. एस. उबाळे, प्रा. सौ. सुपुगडे तसेच ग्रामस्थ व सर्व संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान महत्त्वाचेः प्रा. संदीप पाटील

## कन्या महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर

आयर्विन टाइम्स

इचलकरंजी,(प्रतिनिधी): येथील श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गेली सात दिवस चंदुर या गावी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या शिबिराचा सांगता समारंभ विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.संदीप पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

'राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरासारख्या उपक्रमांमधून स्वयंसेविकांचा सर्वांगीन विकास होतो आणि हे अनुभव आयुष्यभराची पुंजी म्हणून स्वयंसेविकांना उपयोगी ठरतात. त्या आधारे मोठ्या आव्हानांचा मुकाबला करण्याइतपत स्वयंसेविका सक्षम बनतात,असे मत त्यांनी व्यक्त केले.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष पंचायत समिती हातकणंगलेचे माजी सभापती महेश पाटील होते. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये स्पष्ट केले की, 'आजच्या मोबाईलच्या जमान्यात श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम अशा शिबीरामधुन होत असते. त्यामुळे अशी शिबीरे ही काळाची गरज आहेत.'

कार्यक्रमाच्या आरंभी एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ धीरज शिंदे यांनी प्रस्तावना, प्रमुख पाहुण्यांची ओळख आणि एनएसएस शिबीर कालावधी दि १६ जानेवारी ते २२ जानेवरी २०२४ दरम्यान शिबिरांमधील राबविलेल्या विविध उपक्रमांचा विस्तृत अहवालाचे वाचन केले.

या शिबीरास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य प्रो डॉ त्रिशला कदम यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मिळाले. यावेळी स्वयंसेविकांमधील कु. अमृता परमाजे, कु. कोमल राठी, कु. दिव्या बिरनगे, कु. शिवानी सुर्यवंशी, कु. नेहा विधाते, कु. लक्ष्मी कोटगी यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे आभार प्रा संदीप पाटील यांनी तर सुत्रसंचलन डॉ प्रियंका कुंभार यांनी केले.

यावेळी सरपंच सौ स्नेहल कांबळे, उपसरपंच संदीप कांबळे, संजय जिंदे, प्रा. संगिता पाटील यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी प्रा. सोमनाथ गायकवाड, प्रा. स्वाती हाळवणकर, प्रा प्रिया सुतार, अनिल सुतार, तानाजी भारती इतर ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ,स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पुण्य नगरी ७ ■ सोमवार, २२ जानेवारी २०२४

# समाजाशी नाळ जोडण्यासाठी 'एनएसएस' महत्त्वाची : डॉ. चौगले

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा आणि नेत्तृत्वगुण विकसित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. 'एनएसएस'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी समाजाची नाळ जोडता येते, असे प्रतिपादन एनएसएसचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी विवेकानंद महाविद्यालयाच्या पोहाळे तर्फ आळते येथे होणाऱ्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. यावेळी प्रा. संदीप पाटील, डॉ. राजश्री पाटील, प्रा. एल. एस. नाकाडी, सरपंच सुरेखा मोरे, प्रा. एस. पी. थोरात, सुरेश बेनाडे, प्रा. एन. पी. मोटे, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. जी. एस. उबाळे, डॉ. ए. एस. तपासे, डॉ. सरिता शिंदे, प्रा. एस. पी. वेदांते आदी उपस्थित होते.

# विवेकानंदच्या प्रविण जमखंडी याची प्रजासत्ताक दिन संचलनासाठी निवड



**कोल्हापूर :** येथील विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा स्वयंसेवक प्रविण विठ्ठल जमखंडी (बी.बी.ए.भाग २) याची २६ जानेवारी २०२४ रोजी शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलनासाठी निवड झाली आहे.

यापूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे झालेल्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलनामध्ये त्याचा सहभाग होता. या प्रीएसआरडी परेड निवड प्रक्रियेत प्रविणने ड्रील व इतर कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवला. या सर्व प्रक्रियेतून त्याची निवड झाली आहे.

त्याच्या या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्रबंधक आर. बी. जोग यांनी अभिनंदन केले आहे.

या विद्यार्थ्यास राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील, प्रा. प्रविण बागडे, डॉ. राजश्री पाटील, डॉ. जी. एस. उबाळे, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. अस्मिता तपासे, डॉ. एस. डी. शिंदे, सदानंद दुर्गुळे यांचे मार्गदर्शन लाभले.

महासत्ता एकच आवृत्ती

# श्रमसंस्कार शिबिरामधून स्वयंसेविकांचा विकास

## प्रा.संदीप पाटील

चंदुर,ता.२३(वार्ताहर)-

........................

**राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरासारख्या उपक्रमांमधून स्वयंसेविकांचा सर्वांगिण विकास होतो,असे प्रतिपादन कोल्हापूर येथील एनएसएसचे समन्वयक प्रा.संदीप पाटील यांनी केले.**




**चंदूर येथील कार्यक्रमप्रसंगी बोलताना प्रा.संदीप पाटील,व्यासपिठावर उपस्थित महेश पाटील,सरपंच सौ.स्नेहल कांबळे व इतर मान्यवर.**

श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसांचे विशेष श्रमसंस्कार शिबिर चंदूर (ता.हातकणंगले) येथे संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी पं.स.सभापती महेश पाटील हे होते.

याप्रसंगी महेश पाटील म्हणाले, श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम अशा शिबीरातून होत असल्यामुळे ही शिबीरे काळाची गरज आहेत. एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ.धीरज शिंदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सरपंच सौ.स्नेहल कांबळे, उपसरपंच संदीप कांबळे,संजय जिंदे, प्रा.संगिता पाटील व विद्यार्थीनींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमप्रसंगी प्रा. सोमनाथ गायकवाड,प्रा.स्वाती हाळवणकर, प्रा.प्रिया सुतार, अनिल सुतार, तानाजी भारती,सर्व ग्रामपंचायत सदस्य,ग्रामस्थ, स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सदर शिबीरास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.त्रिशला कदम यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मिळाले. सुत्रसंचालन डॉ. प्रियंका कुंभार यांनी केले.आभार प्रा.संदीप पाटील यांनी आभार मानले.

# समाजाशी नाळ जोडण्यासाठी 'एनएसएस' महत्त्वाची : डॉ. चौगले

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा आणि नेत्तृत्वगुण विकसित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. 'एनएसएस'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी समाजाची नाळ जोडता येते, असे प्रतिपादन एनएसएसचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी विवेकानंद महाविद्यालयाच्या पोहाळे तर्फ आळते येथे होणाऱ्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रतिपादन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. यावेळी प्रा. संदीप पाटील, डॉ. राजश्री पाटील, प्रा. एल. एस. नाकाडी, सरपंच सुरेखा मोरे, प्रा. एस. पी. थोरात, सुरेश बेनाडे, प्रा. एन. पी. मोटे, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. जी. एस. उबाळे, डॉ. ए. एस. तपासे, डॉ. सरिता शिंदे, प्रा. एस. पी. वेदांते आदी उपस्थित होते.

# समाजाशी नाळ जोडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना : डॉ. टी. एम. चौगले



कोल्हापूर : विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी समाजाची नाळ जोडली जाते असे शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. टी. एम. चौगले प्रतिपादन केले.

विवेकानंद महाविद्यालयाच्या पोहाळे तर्फ आळते येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, एनएसएसच्या शिबिरातून विद्यार्थ्यांनी स्वतःचा शोध घ्यावा. कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ. राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. एन. एस. नाकाडी यांनी आभार मानले.

यावेळी सरपंच सौ. सुरेखा मोरे, प्रा. एस. पी. थोरात, सुरेश बेनाडे, प्रा. एन. पी. मोटे, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. जी. एस. उबाळे, डॉ. ए. एस. तपासे, डॉ. सरिता शिंदे, प्रा. सी. एस. पी. बेडगे तसेच ग्रामस्थ व सर्व संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.